दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ११९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

## इंडोनेशिया भूकंप: 68 जणांचा मृत्यू, 200 हून अधिक जखमी

जकार्ता, 18 ऑगस्ट : गेल्या आठवड्यात झालेल्या भूकंपानंतर इंडोनेशियातील फ्लोरेस बेटावरील हजारो नागरिक मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. या भूकंपात ६८ जणांचा मृत्यू, तर २०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. तसेच शेकडो घरे आणि इतर इमारतींचे नुकसान झाले आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या माहितीनुसार, सुमारे ५,००० लोकांना तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्यात आले असून, २१३ जण जखमी झाले आहेत.

## केपीएससी भरती घोटाळा प्रकरणी कर्नाटकात ईडीची छापेमारी

**बंगळुरू, 18 ऑगस्ट :** कर्नाटक लोकसेवा आयोगाच्या (केपीएससी) पशुवैद्यकीय अधिकारी भरती प्रक्रियेत कथित भ्रष्टाचार झाल्याच्या आरोपांप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई केली आहे. मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) ईडीच्या पथकांनी कर्नाटकातील तब्बल 13 ठिकाणी छापेमारी करून झडती सुरू केली आहे. या कारवाईदरम्यान शिवशंकरप्पा साहूकार यांच्या घरासह मध्यस्थांच्या ठिकाणांचीही तपासणी करण्यात येत आहे.

# श्रावणाच्या पहिल्याच सोमवारी हर हर महादेव घृष्णेश्वर दर्शनासाठी अलोट गर्दी

**खुलताबाद प्रतिनिधी :** वेरूळ श्रावण महिन्याच्या पहिल्याच सोमवारी आणि सलग सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी झाली. मध्यरात्रीपासून सुरू झालेली गर्दी रात्री उशिरापर्यंत कायम होती. रिमझिम पावसातही हजारो भाविकांनी 'हर हर महादेव', 'बम बम भोले'चा जयघोष करत घृष्णेश्वराचे दर्शन घेतले.

शनिवार, रविवार आणि सोमवारच्या सलग सुट्ट्यांमुळे घृष्णेश्वर मंदिरासह वेरूळ लेणी पाहण्यासाठीही पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. मंदिरापासून जोडरस्त्यापर्यंत बॅरिकेड्स लावून दर्शनासाठी रांगेची व्यवस्था करण्यात आली होती. येण्या-जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग केल्याने दर्शन व्यवस्था सुरळीत राहिली.

मात्र, वाहन नियोजनामुळे अनेक भाविकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. भाविकांची वाहने पूर्वेकडे लेणी परिसरात, तर पश्चिमेकडे भोसले चौकाबाहेर एक ते दीड किलोमीटर





अंतरावर थांबविण्यात आली. त्यामुळे वृद्ध महिला, वृद्ध पुरुष, लहान मुले तसेच बाहेरगावाहून आलेल्या भाविकांना पायी मंदिरापर्यंत जावे लागले.

### गाभाऱ्यातील अभिषेक बंद

श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण श्रावण काळात मंदिराच्या गाभाऱ्यातील अभिषेक बंद ठेवण्यात आला आहे. त्यामुळे भाविकांना बाहेरूनच दर्शन घेण्याची व्यवस्था करण्यात आली.

### महाराष्ट्र सिक्युरिटी फोर्समुळे दलालांना चाप

मंदिर परिसरात महाराष्ट्र सिक्युरिटी फोर्सच्या जवानांची नियुक्ती करण्यात आल्याने सुरक्षाव्यवस्थेला बळ मिळाले आहे. कडक बंदोबस्तामुळे अवैध पद्धतीने दर्शन घडवून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या दलालांना काही प्रमाणात चाप बसल्याचे दिसून आले. भाविकांना सुलभ व पारदर्शक दर्शन मिळण्यासाठी ही व्यवस्था कायम ठेवण्याची मागणी होत आहे.

भाविकांच्या सुरक्षेसाठी मंदिर परिसरात सीसीटीव्ही, छुपे कॅमेरे, खासगी सुरक्षारक्षक तसेच पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात आली. खुलताबाद पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या नियोजनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता

## थोडक्यात वार्ता

### राज्यमंत्री रामदास आठवले परभणी दौऱ्यावर

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले हे बुधवार, (दि. १९) रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. मुंबई येथून देवगिरी एक्स्प्रेसने सकाळी साडे सात वाजता परभणी येथे आगमन होईल. त्यानंतर सकाळी ७.४० वाजता शासकीय विश्रामगृह येथे त्यांची वेळ राखीव असेल. सकाळी ११.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. यानंतर दुपारी १ वाजता सिद्धार्थनगर, पूर्णा येथील दिवंगत भीमराव लोखंडे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. दुपारी १.४५ वाजता गौर, ता. पूर्णा येथील दिवंगत संतोष सावळे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देतील. दुपारी ३ वाजता ते नांदेडकडे प्रयाण करतील.

### दाभोलकर हत्या प्रकरणात सचिन अंदुरेला जामीन; जन्मठेपेलाही स्थगिती

**मुंबई, 18 ऑगस्ट :** मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणात मंगळवारी महत्त्वपूर्ण निर्णय दिला. या प्रकरणात दोषी ठरवण्यात आलेला सचिन अंदुरे याला न्यायालयाने जामीन मंजूर केला असून, पुण्यातील विशेष न्यायालयाने सुनावलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. सचिन अंदुरे याला मिळालेल्या जामिनाच्या निर्णयाचा अभ्यास करण्यात येणार असून, त्यानंतर या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचं मिलिंद देशमुख यांनी स्पष्ट केलं. तर मुंबई उच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर प्रतिक्रिया देताना नरेंद्र दाभोळकर यांचा मुलगा हमिद दाभोळकर यांनी, 'अजून विस्तृत निकाल आलेला नाही. तो वाचल्यानंतर पुढं काय करायचं याचा निर्णय घेण्यात येईल. या प्रकरणातील सहआरोपी शरद कळसकरला देखील एप्रिल महिन्यात जामीन मंजूर झाला आहे. त्याविरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल केली आहे. या प्रकरणातही आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाऊ.' असे सांगितले. 'आधी कळसकर त्यानंतर आता अंदुरेला उच्च न्यायालयाने जामीन दिला. जर या दोघांनी खून केला नाही तर मग कोणी खून केला हे आपल्याला १३ वर्षात शोधता आलं नाही का? या दोघांना सीबीआयने समाजासाठी घातक असं म्हटलं होतं. आताचे बुवाबाजीचे प्रकार पाहता आपण कोणत्या जगात जगतोय हा प्रश्नच पडतोय.' अशी उद्विग्न प्रतिक्रिया देखील मुक्ता दाभोळकर यांनी दिली.

### दिल्लीतील 'सीजेपी'च्या आंदोलनात माओवाद्यांचा सहभाग- जनसंघर्ष समिती

**नवी दिल्ली, 18 ऑगस्ट :** नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीच्या मुद्द्यावर दिल्लीसह देशभरात झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर नव्या वादाला तोंड फुटले आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) वतीने दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनात अरुण भेलके नावाची व्यक्ती सहभागी झाल्याचा दावा जनसंघर्ष समितीने केला आहे. भेलके यांच्या माओवादी पार्श्वभूमीवरून समितीने आंदोलनाचे आयोजक अभिजीत दिपके यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले आहे. आंदोलनादरम्यान अरुण भेलके यांनी संसदेसंदर्भात आक्षेपार्ह आणि धमकीवजा वक्तव्य केल्याचा समितीचा आरोप आहे. या संदर्भातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होत असून, त्यामध्ये संसदेसंदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचे दिसत असल्याचा दावा समितीने केला आहे. मात्र, या व्हिडिओची स्वतंत्रपणे सत्यता पडताळण्यात आलेली नाही.




# पुंडलिकनगरच्या पुंडलिकराव राऊत यांच्या बलिदानाची प्रेरणादायी कहाणी

## स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्याकडून पुंडलिकराव राऊत यांच्या स्मारकास अभिवादन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील गजबजलेल्या पुंडलिकनगर परिसराच्या नामकरणामागे शूर शिवसैनिक पुंडलिकराव राऊत यांच्या त्याग, शौर्य आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणादायी कहाणी आहे. मूळचे बीड जिल्ह्यातील असलेले पुंडलिकराव राऊत १९८५ मध्ये कुटुंबासह छत्रपती संभाजीनगर शहरात स्थायिक झाले. त्यावेळी हा परिसर 'नेहरूनगर' म्हणून ओळखला जात होता.

पुंडलिकराव राऊत यांनी परिसरातील नागरिकांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविला. शिवसेनेचे शाखाप्रमुख म्हणूनही ते सक्रिय होते.



अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहत असताना त्यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला. या हल्ल्यात त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले. त्यांच्या शौर्याची आणि त्यागाची स्मृती कायम राहावी, या उद्देशाने १८ ऑगस्ट १९९० रोजी नेहरूनगरचे 'पुंडलिकनगर' असे नामकरण करण्यात आल्याचे सांगितले जाते.

पुंडलिकराव राऊत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या स्मारकास स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी अभिवादन केले. यावेळी पुंडलिकनगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी राऊत यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या शौर्याला उजाळा दिला.

आज वेगाने विकसित झालेला पुंडलिकनगर परिसर हा शहराचा महत्त्वाचा भाग बनला आहे. मात्र, या परिसराच्या नावामागे एका सामान्य कार्यकर्त्याच्या त्यागाची आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी लढताना दिलेल्या बलिदानाची प्रेरणादायी आठवण दडलेली आहे. पुंडलिकनगर हे केवळ परिसराचे नाव नसून पुंडलिकराव राऊत यांच्या शौर्याची आणि सामाजिक बांधिलकीची स्मृती जपणारी ओळख ठरली आहे.

# किशोर शितोळे यांच्याकडून पोलिस आयुक्तांचा सत्कार

## तिरंगा यात्रा शांततामय वातावरणात पार



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य तिरंगा यात्रेला राष्ट्रप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने मोठी गर्दी झाली होती. या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्था, पोलिस बंदोबस्त आणि सुरक्षेचे चोख नियोजन करून तिरंगा यात्रा शिस्तबद्ध व शांततामय वातावरणात यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल भारतीय जनता पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांचा सत्कार करून पोलिस दलाचे आभार मानले. तिरंगा यात्रेच्या मार्गावर मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्याचे पोलिसांसमोर आव्हान होते. मात्र, पोलिस दलाने आधीच नियोजन करून विविध ठिकाणी बंदोबस्त तैनात केला. वाहतुकीचे नियमन, यात्रेतील सहभागींची सुरक्षा आणि मार्गावरील व्यवस्थेवर विशेष लक्ष देण्यात आले.

# हडको टीव्ही सेंटरमध्ये अनधिकृत बॅनर-पोस्टरविरोधात महापालिकेची धडक कारवाई

## एकाच दिवसात दीड लाखांहून अधिक दंड वसूल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील सार्वजनिक ठिकाणांचे विद्रुपीकरण करणाऱ्या अनधिकृत बॅनर, पोस्टर, जाहिरात फलक व भिंतीपत्रकांविरोधात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने धडक मोहीम सुरू केली आहे. मंगळवारी (दि. १८) हडको टीव्ही सेंटर परिसरात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत १०० पेक्षा अधिक आस्थापनांची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २० व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकाच दिवसात दीड लाख रुपयांहून अधिक दंड वसूल करण्यात आला.

महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या नियोजनानुसार नागरिक मित्र पथक व घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या पथकांनी ही कारवाई केली. हडको टीव्ही सेंटर परिसरातील विविध व्यावसायिक आस्थापनांची पाहणी करताना




अनधिकृत जाहिरात साहित्य आढळून आलेल्या आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. कारवाई करण्यात आलेल्या आस्थापनांमध्ये कोचिंग क्लासेस, रुग्णालये, हॉटेल, साडी व कापड दुकाने, खानावळी, शॉपिंग मॉल यांचा समावेश आहे. उल्लंघनाचे स्वरूप व प्रमाणानुसार संबंधितांना पाच हजारांपासून ५० हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्यात आला. महापालिका प्रशासनाने ही कारवाई केवळ एका परिसरापुरती मर्यादित नसून, शहरभर अनधिकृत बॅनर-पोस्टरविरोधात मोहीम राबविण्याचे स्पष्ट केले आहे.

## लोकप्रतिनिधींचा आवाज दाबण्याचा प्रयत्न हा लोकशाहीवर थेट आघात

# सरपंच मंगेश साबळे यांच्या तडीपारीच्या निषेधार्थ जनक्षोभ उसळणार!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** गेवराई पायगा (ता. फुलंब्री) येथील लोकनियुक्त सरपंच तथा शेतकरी-कष्टकऱ्यांच्या प्रश्नांसाठी नेहमी आक्रमक भूमिका घेणारे मंगेश साबळे यांना छत्रपती संभाजीनगर आणि जालना या दोन जिल्ह्यांमधून दोन वर्षांसाठी तडीपार (तडीपार/हद्दपार) करण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. या हुकूमशाही आणि दडपशाही कारवाईमुळे ग्रामीण भागासह राजकीय वर्तुळात प्रचंड संताप उसळला असून, निष्क्रिय प्रशासनाला जाब विचारणाऱ्या लोकप्रतिनिधींचा आवाज दाबण्याचा हा कुटिल डाव असल्याचा गंभीर आरोप केला जात आहे.

सरपंच मंगेश साबळे हे केवळ नावापुरते सरपंच नसून, ते तळागाळातील शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे आक्रमक नेते म्हणून ओळखले जातात. शासनाच्या



धोरणात्मक त्रुटी असोत किंवा प्रशासकीय लाचखोरी व अनास्था, प्रत्येक मुद्द्यावर त्यांनी हटके आणि अनोख्या आंदोलनांच्या माध्यमातून प्रशासनाला धारेवर धरले आहे. स्थानिक पातळीपासून ते राज्य पातळीपर्यंत जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. परंतु, याच जनहितैषी भूमिकेची धास्ती घेऊन प्रशासनाने त्यांच्यावर तडीपारीची कारवाई चालवल्याचे बोलले जात आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारे गुन्हेगार मोकाट फिरत असताना, केवळ प्रशासनाच्या चुका चव्हाट्यावर आणणाऱ्या आणि लोकशाही मार्गाने जाब विचारणाऱ्या लोकप्रतिनिधीवर अशी कठोर कारवाई करणे म्हणजे सरळसरळ राजकीय सूडबुद्धीचे दर्शन असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

तडीपारीसारखी अत्यंत कठोर कारवाई ही सहसा गंभीर गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या किंवा समाजासाठी धोकादायक ठरणाऱ्या घटकांवर केली जाते. मात्र, एका लोकनियुक्त सरपंचावर अशी कारवाई करणे म्हणजे थेट संविधानिक अधिकारांवर आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालण्यासारखे आहे. जर लोकप्रतिनिधींनाच अशा प्रकारे खोट्या किंवा दबावतंत्राच्या कारवाया करून गप्प केले गेले, तर सामान्य जनतेचा न्यायव्यवस्था आणि प्रशासनावरील उरलासुरला विश्वासही पूर्णपणे नष्ट होईल. यामुळे स्थानिक पातळीवरील लोकशाही व्यवस्था बळकट होण्याऐवजी खिळखिळी होईल, अशी भीती संतप्त नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

सरपंच मंगेश साबळे यांच्यावरील या अन्यायकारक आणि दडपशाहीच्या तडीपारीच्या नोटीशीचा विविध शेतकरी संघटना, ग्रामस्थ आणि नागरिकांकडून तीव्र शब्दांत निषेध नोंदवण्यात आला आहे. प्रशासनाने ही सूडबुद्धीची कारवाई तात्काळ मागे घ्यावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. लोकशाहीत आवाज उठवणाऱ्या सरपंचाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका आता जनमानसातून घेतली जात आहे.

# सेबी अधिकाऱ्याच्या नावाने धमकी; ज्येष्ठ नागरिकाला 29.36 लाखांचा गंडा, डिजिटल अटकेच्या नावाखाली फसवणूक

## महिलेपासून सुरु झालेला फोन, सीबीआय-इनव्हेस्टिगेशन ऑफिसरच्या खोट्या कॉलने संपूर्ण आयुष्याची पुंजी लुटली

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण/रायगड:** सध्या राज्यभरात चर्चेत असलेल्या "डिजिटल अटक" आणि "मनी लॉन्ड्रिंग"च्या नावाने होणाऱ्या फसवणुकीचा एक गंभीर प्रकार उरणमध्ये उघडकीस आला आहे. उरण येथील बोरी नाका परिसरात राहणाऱ्या 68 वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला टेलिकॉम कंपनी आणि सीबीआय अधिकाऱ्याच्या नावाने धमकी देऊन तब्बल 29 लाख 36 हजार 94 रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात अनोळखी आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी श्री. शांताराम हे राहणार उरण येथे राहत असून ते सेवानिवृत्त आहेत. दिनांक 14 जुलै 2026 रोजी दुपारी 2.45 वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मोबाईल क्रमांक वरून या अनोळखी क्रमांकावरून एका महिलेचा फोन आला. सदर महिलेने स्वतःला टेलिफोन निगममधून बोलत असल्याचे सांगितले आणि शांताराम या नावाने मुंबईत एक बनावट सिमकार्ड वापरले जात असल्याचे सांगून धमकी दिली.

या फोननंतर काही दिवसांनी या वेगवेगळ्या क्रमांकावरून वेगवेगळ्या व्यक्तींचे कॉल येण्यास सुरुवात झाली. कॉल करणाऱ्यांपैकी एकाने स्वतःला राजेश प्रधान नावाचा इनव्हेस्टिगेशन ऑफिसर, दुसऱ्याने राजेंद्र सिंग नावाचा सीबीआय अधिकारी आणि तिसऱ्याने सुनीलकुमार गौतम नावाचा पोलीस




अधिकारी असल्याचे सांगितले. त्यांनी शांताराम म्हात्रे यांना सांगितले की संदीप कुमार नावाच्या व्यक्तीच्या मनी लॉन्ड्रिंग, ड्रग्ज स्मगलिंग आणि वुमन ट्रॅफिकिंग या गुन्ह्यात त्यांच्या नावाने आयसीआयसीआय बँकेत 78 लाख रुपये जमा झालेले आढळून आले आहेत आणि यात त्यांना अटक होऊ शकते.

या भीतीपोटी आणि अधिकाऱ्यांच्या धाकाने शांताराम यांनी 14 जुलै ते 12 ऑगस्ट 2026 या कालावधीत वेगवेगळ्या वेळी आरोपींनी सांगितलेल्या बँक खात्यांमध्ये एकूण 29 लाख 36 हजार 94 रुपये जमा केले. पैसे गेल्यानंतरही आरोपींनी त्यांचा पाठलाग सोडला नाही. अखेर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शांताराम यांनी 17 ऑगस्ट 2026 रोजी रात्री 9.01 वाजता उरण पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून उरण पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम 204, 318(4), 319(2), 3(5) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम 2008 चे कलम 66(डी) तसेच भादंवि कलम 170, 420, 419, 34 प्रमाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक 299/2026 दाखल केला आहे.

या प्रकरणाचा तपास उरण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राहुल काटवाणी हे करत आहेत. घटनास्थळी ठाणे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर आणि पोलीस उपनिरीक्षक रोशन काथारा यांनी देखील भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी फिर्यादीचा जबाब यथार्थ प्रणालीद्वारे नोंदवून घेतला असून आरोपींचा शोध सुरू केला आहे. या घटनेनंतर उरण पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही सरकारी यंत्रणेच्या नावाने फोन आल्यास घाबरून जाऊ नये. सीबीआय, पोलीस किंवा इतर कोणतीही यंत्रणा फोनवर पैसे मागत नाही किंवा डिजिटल अटक करत नाही. अशा प्रकारचा संशयास्पद कॉल आल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा 1930 या सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधावा.

दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## तपासातील त्रुटी आणि न्यायाचा प्रश्न

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येला तेरा वर्षे उलटून गेल्यानंतरही या खटल्यातील अनिश्चितता कायम असणे हे न्यायव्यवस्था आणि तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आहे. विशेष न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्या सचिन अंदुरे याला मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला जामीन आणि शिक्षेला दिलेली स्थगिती या प्रकरणातील कायदेशीर गुंतागुंत अधोरेखित करते. यापूर्वी सहआरोपी शरद कळसकर यालाही जामीन मिळाला होता. त्यामुळे ज्या दोन आरोपींना हत्येप्रकरणी दोषी ठरवण्यात आले होते, ते दोघेही आता जामिनावर बाहेर आले आहेत. न्यायालयाने आरोपींच्या ओळख पटवण्याच्या (Test Identification Parade) प्रक्रियेवर आणि साक्षीदारांना छायाचित्रे दाखवून ओळख पटवण्याच्या पद्धतीवर उपस्थित केलेले प्रश्न तपास यंत्रणांच्या ढिसाळपणाकडे बोट दाखवतात. सीबीआयसारख्या देशातील सर्वोच्च तपास यंत्रणेने एवढ्या संवेदनशील प्रकरणात केलेल्या तपासात कायदेशीर त्रुटी राहणे अत्यंत खेदजनक आहे. डॉ. दाभोलकर, कॉम्रेड गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांच्या हत्येमागे विशिष्ट विचारसरणीचा आवाज दाबण्याचा सुनियोजित कट होता, असा आरोप सातत्याने केला जात आहे. आरोपींना जामीन मिळाल्यामुळे दाभोलकर कुटुंब आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीने व्यक्त केलेली उद्विग्नता समजून घेण्यासारखी आहे. जर मुख्य आरोपींना अशा प्रकारे तांत्रिक आणि कायदेशीर त्रुटींमुळे जामीन मिळत असेल, तर मूळ सूत्रधार कोण आणि प्रत्यक्ष मारेकरी कोण, हा प्रश्न १३ वर्षांनंतरही अनुत्तरितच राहतो. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील केले जाणार असले, तरी या प्रकरणातील तपासाचे गांभीर्य आता सर्वोच्च न्यायालयातच सिद्ध व्हावे लागेल. वैचारिक लढाई हिंसेने दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींचा पर्दाफाश होणे आणि पीडितांना खरा न्याय मिळणे हीच डॉ. दाभोलकरांच्या विचारांना आणि कार्याला खरी श्रद्धांजली ठरेल. या खटल्याचा अंतिम निकाल काय लागतो, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिले आहे.

## खुलताबाद दर्गा उर्स ई-निविदा प्रक्रियेतील मनमानी कारभाराविरोधातील याचिका उच्च न्यायालयाने केली निकाली तक्रारी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाकडे मांडण्याची मुभा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर (ब्युरो चीफ) :** खुलताबाद येथील ऐतिहासिक हजरत शेख जरजरी बक्ष दर्गा उर्स व्यवस्थापन समितीच्या मनमानी कारभाराविरोधात उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली याचिका निकाली काढण्यात आली असून, याचिकाकर्त्यांना आपल्या सर्व तक्रारी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे मांडण्याची मुभा उच्च न्यायालयाने दिली आहे. या प्रकरणी अ‍ॅड. चंद्रकांत व्ही. ठोंबरे, अ‍ॅड. प्रियादर्शनी पाटील आणि अ‍ॅड. प्रिया तुपे यांनी कायदेशीर बाजू मांडली.

दोनशे वर्षांपेक्षा अधिक काळापासून चालत आलेल्या परंपरेनुसार, हजरत शेख जरजरी बक्ष उर्स व्यवस्था समिती जुन्या १९८१ च्या आदेशानुसार स्थापन करण्यात आली होती. मात्र, वक्फ कायदा १९९५ अस्तित्वात आल्यापासून कुठल्याही प्रकारची सुधारित योजना मंजूर नसतानाही, दर्गा समितीचे अध्यक्ष असलेले खुलताबाद नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी आणि तहसीलदार यांनी मनमानी कारभार चालवून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. उर्स समितीच्या माध्यमातून वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावावर धनादेश (चेक) काढून पैशाची अफरातफर करण्यात आली असून, दर्गा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, तहसीलदार आणि नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी यांच्या नावावर लाखों रुपयांचे चेक काढून त्यांचा वैयक्तिक कामासाठी दुरुपयोग केल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात आला आहे.

दुसरीकडे, खुदामीन दर्गा जेड हदेकलन खुलताबाद या दर्ग्याचे नियमित लेखापरीक्षण (ऑडिट) करून वक्फ फंड वक्फ बोर्डाकडे जमा केला जातो, परंतु उर्स व्यवस्थापन समितीने आजवर कधीही कुठलेही कायदेशीर ऑडिट केले नसल्याचे समोर आले आहे. तसेच, कुठलीही कायदेशीर परवानगी न घेता १० जुलै २०२६ रोजी घाईघाईने ई-निविदा काढून 'एस. के. एंटरप्रायझेस' यांना ८१,७४,४०० रुपये आणि 'टापरे इलेक्ट्रोनिक्स' यांना ९७,५९,९०० रुपयांच्या निविदा मंजूर करण्यात आल्या आणि त्यांना तात्काळ वर्क ऑर्डर देखील देण्यात आल्या. याशिवाय, स्मशानभूमीत प्रस्तावित ले-आउट टाकत मनमानी पद्धतीने ५० ते ६० हजार रुपये प्रति महिना आगाऊ भाडे व अनामत रक्कम घेऊन दुकानांच्या जागा वाटप करण्यात आल्या. उर्स समितीने अशा प्रकारे मनमानी व अवाजवी भाडे आकारून परिसरातील हजारो गरीब दुकानदारांवर अन्याय केल्याचे याचिकाकर्त्यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. या सर्व गंभीर प्रकारांविरोधात आणि काढण्यात आलेल्या ई-टेंडर प्रक्रियेत झालेला भ्रष्टाचार व नियमबाह्य कारभार रद्द करण्यात यावा, यासाठी शेख रहीम व इतर नागरिकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे यांच्या समोर सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने नमूद केले की, निविदा प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात पूर्ण झाली असल्याने या टप्प्यावर न्यायालयाला हस्तक्षेप करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे न्यायालयाने याचिकाकर्त्यांना त्यांची बाजू व सर्व तक्रारी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाकडे कायदेशीररित्या दाखल करण्याची मुभा देऊन याचिका निकाली काढली. या संपूर्ण प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने अ‍ॅड. चंद्रकांत व्ही. ठोंबरे, अ‍ॅड. प्रियादर्शनी पाटील आणि अ‍ॅड. प्रिया तुपे यांनी यशस्वी सहकार्य केले.

## उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय व ग्रंथमित्र पुरस्कारासाठी 25 सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने सन २०२५-२६ या वर्षासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार तसेच डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येणार आहेत.

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, नागरिकांना अधिक चांगल्या ग्रंथालयीन सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हे पुरस्कार देण्यात येतात. ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवकांचा गौरव करण्यासाठी भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

**टीसी हरवली आहे**

**मिर्झा सैफ बेग जाकेर बेग रा. जाकेर हुसेन नगर सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर याची सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तळणी, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर, येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वर्ग १२वी पास ची शाळा सोडण्याचा दाखला (टी. सी.) छत्रपती संभाजीनगर ते सिल्लोड या प्रवासात हरवली आहे. करिता सापडल्यास**

**या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. : 9175491617**

## "माझी शाळा माझी जबाबदारी" ही भावना प्रत्येक गावात निर्माण झाली पाहिजे

गावाच्या वेशीवरून आत प्रवेश केला की विकासाची अनेक चिन्हे दिसतात डांबरी रस्ते, विजेचे खांब, पाण्याच्या टाक्या, मोबाईलचे टॉवर, सिमेंटची घरे आणि बदलत्या जीवनशैलीचे चित्र. गाव बदलत आहे, असे आपल्याला वाटते. परंतु या सगळ्या विकासाच्या गर्दीत एक प्रश्न मात्र आपण स्वतःला विचारला पाहिजे या गावातील मुलांच्या भविष्याचे काय?कारण गावाचा खरा विकास हा केवळ रस्त्यांच्या रुंदीने, सिमेंटच्या घराणे किंवा पाण्याच्या टाक्यांच्या संख्येने मोजता येत नाही. गावाचा खरा विकास पाहायचा असेल तर सकाळच्या वेळी गावातील शाळेच्या पटांगणात जावे. तिथे प्रार्थनेसाठी हात जोडून उभी असलेली मुले, त्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने, हातातील पुस्तके आणि त्या स्वप्नांना दिशा देणारे शिक्षक दिसले, तर त्या गावाचे भविष्य जिवंत आहे, असे म्हणता येईल.पण याच शाळेच्या दाराला कुलूप लागले तर? घंटा वाजेनाशी झाली तर? फळा रिकामा राहिला तर? पटांगणातील मुलांचा आवाज कायमचा शांत झाला तर? अशा असंख्य प्रश्नांनी मनात घर करून गावाचे काय होईल हा प्रश्न उद्भवू नये यासाठी महाराष्ट्रासह संपूर्ण देशासमोर एक अत्यंत गंभीर प्रश्न उभा आहे सरकारी शाळांना कुलूप का लागत आहे?

सरकारी शाळा बंद होणे म्हणजे फक्त एक शासकीय संस्था बंद होणे नव्हे. त्या शाळेच्या माध्यमातून गावातील गरीब, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कामगार आणि सामान्य कुटुंबातील मुलांना त्यांच्या घराजवळ मिळणारी शिक्षणाची संधी कमी होणे होय.एका गरीब आईचे स्वप्न त्या शाळेत असते.

एका शेतकरी वडिलांची आशा त्या शाळेत असते.एखाद्या मुलीच्या शिक्षणाची पहिली पायरी त्या शाळेत असते.एखाद्या मुलाच्या डॉक्टर, शिक्षक, अधिकारी किंवा वैज्ञानिक होण्याच्या स्वप्नाचा पहिला धडा त्या वर्गखोलीत शिकवला जातो.

महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील शाळेची अधिकृत आकडेवारीही समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. यु-डायस प्लस च्या आकडेवारीनुसार भारतातील सरकारी शाळांची संख्या 2020-21 मधील सुमारे 10.32 लाखांवरून 2024-25 मध्ये सुमारे 10.13 लाखांपर्यंत आली आहे. म्हणजे या कालावधीत सरकारी शाळांच्या संख्येत मोठी निव्वळ घट नोंदली गेली. महाराष्ट्रातही सरकारी शाळांची संख्या 2020-21 मधील 65,734 वरून 2024-25 मध्ये 64,884 झाली. म्हणजे चार वर्षांत 850 सरकारी शाळांची निव्वळ घट झाल्याचे निदर्शनास येते.या 850 शाळा प्रत्यक्ष बंद झाल्याच आहेत, असे सरसकट म्हणता येणार नाही. विद्यार्थी संख्येअभावी शाळांचे विलीनीकरण, पुनर्रचना, प्रशासकीय बदल किंवा नोंदणीतील बदल यामुळेही आकडे बदलू शकतात. पण प्रश्न तरीही गंभीर आहे.कारण आकडा 850 असो किंवा त्यापेक्षा वेगळा असो ग्रामीण भागातील मुलांच्या घराजवळील शाळांचे जाळे कमी होणे ही चिंतेची बाब आहे.

सरकारी असो वा निमसरकारी शाळांच्या बाबतीत सर्वाधिक चर्चिला जाणारा मुद्दा म्हणजे घटती पटसंख्या. काही शाळांमध्ये विद्यार्थी संख्या अत्यंत कमी आहे. महाराष्ट्रात कमी पटसंख्येच्या निमसरकारी व जिल्हा परिषद शाळांचा प्रश्न वेळोवेळी चर्चेत आला आहे.पण आपण एक मूलभूत प्रश्न विचारणार आहोत का? पटसंख्या कमी का झाली?

गावातील लोकसंख्या कमी झाली का?कुटुंबांचे स्थलांतर झाले का?

जन्मदर कमी झाला का? पालक खासगी शाळांकडे वळले का?

इंग्रजी माध्यमाचे आकर्षण वाढले का? सरकारी शाळांबद्दल पालकांचा विश्वास कमी झाला का? शाळेत सुविधा कमी आहेत का? शिक्षकांची कमतरता आहे का?शाळेतील शिक्षणपद्धतीत बदलाची गरज आहे का? हे प्रश्न न विचारता केवळ "विद्यार्थी कमी आहेत, म्हणून शाळा बंद करा" हा निर्णय घेतला तर आपण समस्येवर उपचार करत नाही; आपण समस्येचा एक परिणाम मिटवत असतो. समजा एखाद्या दुर्गम गावात 15 विद्यार्थी आहेत.ही 15 मुले कमी आहेत म्हणून त्यांची स्वप्नेही कमी आहेत का? एखाद्या आदिवासी पाड्यावर 12 मुले आहेत.त्या 12 मुलांना शिक्षणासाठी मोठ्या गावात पाठवणेच विकासाची निशाणी आहे का?लहान वयातील मुलांना रोज लांबचा प्रवास करायला लावणे, पावसाळ्यातील रस्त्यांच्या अडचणी सहन करायला लावणे, वाहतुकीचा खर्च पालकांवर टाकणे हा सामाजिक न्यायाचा मार्ग असू शकत नाही. कमी पटसंख्या ही समस्या आहे; पण कमी पटसंख्या असलेल्या शाळांना अधिक सक्षम करण्याचा विचारही तितकाच आवश्यक आहे.

शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक पालकाला आपल्या मुलासाठी चांगले शिक्षण हवे असते. त्यात चुकीचे काहीच नाही.आजचा पालक विचारतो मुलाला इंग्रजी किती शिकवले जाते?संगणक आहे का?इंटरनेट आहे का?डिजिटल शिक्षण आहे का?विज्ञान प्रयोगशाळा आहे का? खेळाची सुविधा आहे का?शिस्त आणि सुरक्षितता आहे का? मुलांवर वैयक्तिक लक्ष मिळते का?

या अपेक्षा अवास्तव नाहीत. त्यामुळे सरकारी शाळांनीही काळाची पावले ओळखली पाहिजेत.पालकांचा विश्वास परत मिळवायचा असेल तर सरकारी शाळेने स्वतःची नवी ओळख निर्माण करावी लागेल.गाव तिथे सरकारी शाळा का हवी?गाव तिथे रस्ता असणे आवश्यक आहे.गाव तिथे पाणी असणे आवश्यक आहे.

गाव तिथे आरोग्याची सुविधा असणे आवश्यक आहे.पण त्याचबरोबर गाव तिथे शाळा असणेही तितकेच आवश्यक आहे.

रस्ता गावाला जगाशी जोडतो; पण शाळा गावातील मुलांना ज्ञानाच्या जगाशी जोडते.रस्ता माणसाला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेतो; पण शाळा मुलाला अज्ञानातून ज्ञानाकडे,परिस्थितीतून संधीकडे आणि स्वप्नातून यशाकडे घेऊन जाते.म्हणूनच "गाव तिथे रस्ता आणि रस्ता तिथे शाळा"

ही केवळ घोषणा न राहता ग्रामीण विकासाचे धोरण बनले पाहिजे.

शाळा तिथे तंत्रस्नेही शिक्षक हवेत

आजची मुले डिजिटल युगात वाढत आहेत. इंटरनेट, संगणक, स्मार्टफोन, डिजिटल व्हिडिओ, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विविध ऑनलाइन साधने त्यांच्या जगाचा भाग झाली आहेत.मग शिक्षणपद्धतीही काळानुरूप बदलली पाहिजे.डिजिटल बोर्ड, संगणक, इंटरनेट, शैक्षणिक व्हिडिओ, ई-कंटेंट, डिजिटल ग्रंथालय आणि प्रयोगाधारित शिक्षण यांचा योग्य वापर सरकारी शाळांमध्ये वाढवला पाहिजे.

पण तंत्रज्ञान आले म्हणजे शिक्षण आधुनिक झाले, असे नाही.

तंत्रज्ञान शिक्षकाची जागा घेणार नाही; मात्र तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारा शिक्षक विद्यार्थ्यांच्या शिकण्याला नवी दिशा देऊ शकतो.कारण मशीन माहिती देऊ शकते; पण विद्यार्थ्याच्या मनाला प्रेरणा देण्याचे काम शिक्षकच करू शकतो.

म्हणून शिक्षक तंत्रस्नेही असण्याबरोबरच संवेदनशील, प्रयोगशील, विद्यार्थीकेंद्री आणि मूल्याधिष्ठित असणे आवश्यक आहे.

आज शिक्षणाची चर्चा अनेकदा परीक्षेतील गुणांभोवती फिरते.

पण खरे शिक्षण यापेक्षा मोठे आहे.

विद्यार्थी प्रश्न विचारतो का?तो विचार करू शकतो का?तो प्रयोग करू शकतो का?तो समस्येवर उपाय शोधू शकतो का? त्याच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन आहे का त्याला संविधानातील स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता समजते का? तो पर्यावरणाबद्दल संवेदनशील आहे का? समाजातील इतर घटकांविषयी आदर बाळगतो का?

हे प्रश्नही शिक्षणाच्या गुणवत्तेचे मापदंड आहेत.गुणवत्ता म्हणजे फक्त परीक्षेतील गुण नव्हेत; गुणवत्ता म्हणजे जीवन जगण्याची क्षमता.सरकारी शाळेतील मुलाला "आपण कमी आहोत" असे कधीही वाटता कामा नये.त्याच्या मनात एकच भावना निर्माण झाली पाहिजे "माझी शाळा उत्तम आहे आणि माझे भविष्यही उत्तम आहे."

आपण शहरी व ग्रामीण भागातील खासगी शाळेची भव्य इमारत पाहून प्रभावित होतो.मग सरकारी शाळेतील मुलांना चांगल्या सुविधा का मिळू नयेत?सुरक्षित वर्गखोल्या, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वतंत्र आणि सुरक्षित स्वच्छतागृहे, ग्रंथालय, विज्ञान व गणित प्रयोगशाळा, संगणक कक्ष, इंटरनेट, डिजिटल साधने, खेळाचे मैदान आणि क्रीडा साहित्य या सुविधा आज चैनीच्या नसून गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या गरजा आहेत.सरकारी शाळेतील विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या गरीब असू शकतो; पण त्याची स्वप्ने गरीब ठेवण्याचा अधिकार कोणालाही नाही.

गावातील सरकारी शाळेचे ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे कपाट नसावे.

ते विचारांचे केंद्र असावे.चरित्रे वाचताना प्रेरणा मिळते.विज्ञान वाचताना कुतूहल निर्माण होते.

साहित्य वाचताना संवेदनशीलता वाढते.इतिहास वाचताना समाज समजतो.म्हणून प्रत्येक सरकारी शाळेत समृद्ध ग्रंथालय असले पाहिजे. शाळेत दिखाव्यासाठी पुस्तकांचे कपाट नको; पुस्तकांशी मैत्री करणारी मुले हवीत.

मुलांसमवेत मंगल मैत्री करणारे शिक्षक हवेत.

ग्रामीण व शहरी भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील अनेक मुलांसाठी शाळा ही शिक्षणाबरोबर पोषणाचीही महत्त्वाची जागा आहे.म्हणून शालेय पोषण आहार ही केवळ सरकारी योजना नसून मुलांच्या आरोग्याशी जोडलेली जबाबदारी आहे.अन्न स्वच्छ, ताजे, पौष्टिक आणि दर्जेदार असले पाहिजे.

उपाशी पोटाला शिक्षण समजत नाही. विद्यार्थ्याच्या ताटातील प्रत्येक घास हा त्याच्या आरोग्यातील गुंतवणूक आहे.

सरकारी शाळा बंद होण्याला जबाबदार कोण?हा प्रश्न विचारणे सोपे आहे; पण त्याचे उत्तर एका व्यक्तीत सापडणार नाही.

शासनाची जबाबदारी आहे पुरेसा निधी, शिक्षक, पायाभूत सुविधा, प्रशिक्षण, तंत्रज्ञान आणि प्रभावी धोरण देण्याची. शिक्षण प्रशासनाची जबाबदारी आहे शाळांची वास्तविक परिस्थिती समजून घेण्याची, रिक्त पदे भरण्याची, शिक्षकांचे योग्य नियोजन करण्याची आणि गुणवत्तेवर लक्ष ठेवण्याची.शिक्षकांची जबाबदारी आहे. काळानुसार बदलण्याची, तंत्रज्ञान आत्मसात करण्याची, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची आणि पालकांचा विश्वास जिंकण्याची.मात्र संपूर्ण शिक्षकवर्गाला दोष देणे अन्यायकारक आहे. हजारो शिक्षक अत्यंत प्रामाणिकपणे ग्रामीण भागात काम करत आहेत. त्यामुळे व्यक्तीला दोष देण्यापेक्षा व्यवस्थेतील उणिवा आणि सुधारण्याच्या संधी ओळखणे गरजेचे आहे.पालकांचीही जबाबदारी आहे. शाळेच्या बैठकीला जाणे, शिक्षकांशी संवाद साधणे, मुलाच्या शिक्षणात सहभागी होणे आणि शाळेच्या विकासात योगदान देणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत आणि गावाचीही जबाबदारी आहे. गावाची शाळा ही विकासाच्या केंद्रस्थानी असली पाहिजे.आणि समाजाची जबाबदारी तर सर्वांत मोठी आहे.

माजी विद्यार्थी कुठे आहेत?

या प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे.

या गावातील सरकारी शाळेत शिकून डॉक्टर झालेले कुणी आहेत का?अभियंते झालेले कुणी आहेत का?शिक्षक, अधिकारी, उद्योजक, वकील, पत्रकार, समाजसेवक झालेले कुणी आहेत का?

असतील तर त्यांनी आपल्या शाळेकडे पुन्हा वळले पाहिजे.

एखादा माजी विद्यार्थी वर्षातून दहा पुस्तके देऊ शकतो.एखादा डॉक्टर आरोग्य तपासणी घेऊ शकतो.

एखादा अभियंता विज्ञान मार्गदर्शन करू शकतो.एखादा उद्योजक संगणक देऊ शकतो.एखादा तरुण डिजिटल शिक्षणात मदत करू शकतो.एखादा नागरिक फक्त महिन्यातील काही तास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देऊ शकतो.

शाळेला नेहमी पैशांचीच गरज नसते; अनेकदा तिला आपलेपणाची गरज असते.

ग्रामीण व शहरी भागातील कमी पटसंख्येच्या प्रत्येक शाळेचे सामाजिक व शैक्षणिक ऑडिट झाले पाहिजे. शाळा बंद करण्यापूर्वी त्या गावाची भौगोलिक परिस्थिती, विद्यार्थ्यांचे अंतर, वाहतूक, पावसाळ्यातील अडचणी आणि सामाजिक परिस्थिती तपासली पाहिजे.दुर्गम, डोंगराळ, आदिवासी आणि अतिदुर्गम भागातील कमी पटसंख्येच्या शाळांना विशेष संरक्षण मिळाले पाहिजे. प्रत्येक शाळेला किमान पायाभूत सुविधांचा दर्जा दिला पाहिजे.शिक्षकांची रिक्त पदे भरली पाहिजेत.तंत्रस्नेही शिक्षकांसाठी सातत्यपूर्ण प्रशिक्षण दिले पाहिजे.आधुनिक ग्रंथालये व प्रयोगशाळा उभारल्या पाहिजेत.

डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.पोषण आहाराची गुणवत्ता काटेकोरपणे तपासली पाहिजे.पालक-शिक्षक-ग्रामपंचायत सहभाग वाढवला पाहिजे.

आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे

शाळा बंद करण्याआधी शाळा वाचवण्याचे सर्व पर्याय वापरले पाहिजेत.

मी तर म्हणेन गावाने शाळा दत्तक घ्यावी!"माझी शाळा माझी जबाबदारी" ही भावना प्रत्येक गावात निर्माण झाली पाहिजे.गावातील डॉक्टरांनी आरोग्य तपासणी करावी.

अभियंत्यांनी मार्गदर्शन करावे.

माजी विद्यार्थ्यांनी ग्रंथालय समृद्ध करावे.उद्योजकांनी डिजिटल साधने उपलब्ध करून द्यावीत.

महिलांनी पालक सहभाग वाढवावा. तरुणांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण द्यावे.ग्रामपंचायतीने शाळेच्या विकासाचा स्वतंत्र अजेंडा ठेवावा.नागरिकांनी श्रमदान करावे.

एखाद्याने पुस्तक द्यावे.एखाद्याने संगणक द्यावा.एखाद्याने खेळाचे साहित्य द्यावे.एखाद्याने फक्त आपला वेळ द्यावा. कारण शाळा "सरकारची" म्हणून दूर ठेवली तर ती कधीच आपली होणार नाही; "आपल्या गावाची" म्हणून जवळ केली तर तिचे भविष्य आपणच घडवू शकतो. कुलूप लागण्याआधी जागे होऊया! कल्पना करा...उद्या सकाळी गावातील शाळेची घंटा वाजली नाही.प्रार्थनेसाठी मुले उभी राहिली नाहीत.शिक्षक वर्गात गेले नाहीत.फळ्यावर धडा लिहिला गेला नाही.पटांगणात मुलांची धावपळ झाली नाही.त्या दिवशी गावातील एका शाळेची इमारत बंद होईल.पण प्रत्यक्षात काय बंद होईल याची कल्पना करा. एका मुलाचे स्वप्न.एका मुलीची आशा.एका आईची अपेक्षा.एका वडिलांचे कष्ट.एका शिक्षकाच्या आयुष्यभराच्या प्रयत्नांचे फलित

आणि गावाच्या भविष्याची एक शक्यता.म्हणूनच आपल्या गावकऱ्याच्या सहकार्यातून सरकारी शाळा फुलवा. आपल्या गावातील प्रत्येक मूल शिकवा. आपल्या गावातील सरकारी शाळा टिकवण्यासाठी आज हीच खरी वेळ आहे. उद्या उशीर झालेला असेल.आपण रस्त्यासाठी आवाज उठवतो. आपण पाण्यासाठी आंदोलन करतो.आपण वीजेसाठी प्रशासनाला जाब विचारतो.मग शाळेसाठी आपण किती वेळा एकत्र येतो? या बाबीचे आत्मचिंतन व्हायला हवे.आपण मंदिर वाचवतो.समाजमंदिर वाचवतो. परंपरा जपतो.सण जपतो.मग आपल्या मुलांच्या भविष्याचा पाया असलेली शाळा का वाचवू नये?आज प्रश्न सरकारपुरता नाही.आज प्रश्न शिक्षकांपुरता नाही.आज प्रश्न पालकांपुरता नाही.आज प्रश्न आपला आहे.कारण शाळा सरकारची असली तरी तिथे शिकणारी मुले आपली आहेत.

त्यांची स्वप्ने आपली आहेत.त्यांचे भविष्य आपले आहे.आणि त्या भविष्याची जबाबदारीही आपलीच आहे.चला तर मग,आजच आपण एक संकल्प करूया,गावाच्या सहकार्यातून गाव तिथे सरकारी शाळा हवी! गाव तिथे रस्ता आणि रस्ता तिथे शाळा हवी! शाळा तिथे तंत्रस्नेही शिक्षक हवेत! प्रत्येक शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण हवे!प्रत्येक बालकाला समान संधी हवी!प्रत्येक शाळा आधुनिक, सुरक्षित आणि सुसज्ज हवी!प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार पोषण आहार हवा!शिक्षणव्यवस्थेत काळानुरूप सुधारणा हवी!आणि सर्वांत महत्त्वाचे "आमच्या गावची शाळा बंद होऊ देणार नाही! हे ब्रीद वाक्य मनात करून ठेवा. लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त आहेत.

**समाजभूषण रामदास**
**वच्छलामाई रखमाजी वाघमारे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं. 8888125610**

## महाराष्ट्र सीसीने पटकावले 'इंडिपेंडन्स चॅम्पियन ट्रॉफी'चे विजेतेपद

### आर्यन फायटर्सला उपविजेतेपद; क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ओम साई क्रिकेट क्लब, आर्यन फायटर्स आणि महाराष्ट्र सीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इंडिपेंडन्स चॅम्पियन ट्रॉफी-२०२६' क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्र सीसी संघाने विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात महाराष्ट्र सीसीने आर्यन फायटर्सवर मात करत शानदार विजय नोंदविला. आर्यन फायटर्सला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

स्पर्धेचा हा दुसरा हंगाम असून, महाराष्ट्र सीसी, आर्यन फायटर्स आणि ओम साई क्रिकेट क्लब या तीन संघांमध्ये सामने रंगले. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या स्पर्धेला क्रिकेटप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेतील विविध सामन्यांमध्ये खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात उत्कृष्ट कामगिरी करत उपस्थितांची दाद मिळवली.

अंतिम सामन्यात महाराष्ट्र सीसी आणि आर्यन फायटर्स यांच्यात चुरशीची लढत झाली. दोन्ही संघांच्या खेळाडूंनी विजयासाठी अखेरपर्यंत शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, महाराष्ट्र सीसीच्या खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांत सरस कामगिरी करत सामन्यावर वर्चस्व मिळविले. दमदार सांघिक खेळाच्या जोरावर महाराष्ट्र सीसीने विजेतेपदावर आपले नाव कोरले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी ओम साई कन्स्ट्रक्शनचे संचालक रोहिदास गायकवाड तसेच आर्यन फायटर्सचे कर्णधार व आरव ट्रॅव्हल्सचे संचालक गणेश इंगळे यांनी विशेष परिश्रम घेतले. व्हिजन कल्याण इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.चे संचालक दीपक इंगळे आणि कृष्णा थोरात पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. दत्ता आव्हाड यांनी बॉल स्पॉन्सर म्हणून सहकार्य केले. वसीम पठाण, सय्यद चांद, समीर खान, लखन सलामपुरे आणि विलास गायकवाड यांनीही स्पर्धेच्या आयोजनासाठी विशेष सहकार्य केले. या स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंमध्ये सांघिक भावना, शिस्त, परस्पर सन्मान आणि खिलाडूवृत्ती जोपासण्यास प्रोत्साहन मिळाले. स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित या क्रिकेट स्पर्धेमुळे क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## आता न्यायपालिकेतील "टायपिंग स्किल" परीक्षेचा बट्ट्याबोळ पहाता; ताबडतोब फेरपरीक्षा घेण्यात यावी

सध्या देशासह राज्यात विद्यार्थ्यांच्या भविष्याशी सरकार काय-काय खेळ खेळत आहे हे सर्वांच्या समजन्याच्या पलीकडचे असल्याचे दिसून येते. स्पर्धा परीक्षांतील सावळा गोंधळ थांबता-थांबेनां, या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर जंतरमंतर,बिहार,झारखंडसह अनेक राज्यात जेन-झीचे आंदोलन झाले आणि सुरू आहे.हे सर्व सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे तरी पुन्हा-पुन्हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होत आहे ही अत्यंत दुःखद व दुर्दैवी बाब आहे आणि याची पुनरावृत्ती हायकोर्टाच्या टायपिंग स्किल परीक्षे दरम्यान दिसून आली.आज विद्यार्थ्यांच्या भविष्याचे नुकसान होत आहे त्याचे काय?याचे उत्तर कोण देणार! सरकार असो अथवा हायकोर्ट विद्यार्थ्यांचे भविष्य खराब करू नका. हायकोर्टाच्या टायपिंग परीक्षेसाठी राज्यात १९ सेंटर होते.मुख्य म्हणजे टायपिंग परीक्षा कशा पध्दतीने होणार आहे याचीही कोणत्याही प्रकारची नोटीफीकेशन जाहिरीमध्ये किंवा एडमिशन कार्डमध्ये नव्हती.ऐनवेळेवर नोटीफीकेशन जाहीर केली व विद्यार्थ्यांची तारांबळ उडाली.ही सर्वात मोठी चूक हायकोर्टाने परीक्षेच्या दरम्यान केल्याचे दिसून येते. म्हणजे ज्या गोष्टी विद्यार्थ्यांना किंवा उमेदवारांना परीक्षेच्या दरम्यान १० ते १५ दिवस अगोदर माहित असने आवश्यक असते त्यापासून हायकोर्टाने उमेदवारांना कोसो दुर ठेवल्याचे दिसून आले. त्यामुळे सर्वच ठिकाणी सुरळीत परीक्षा झालीच नाही ही बाब विद्यार्थ्यांच्या आक्रोशावरून स्पष्ट दिसून येते.या गोंधळलेल्या परीस्थितीमुळे आज ९९ टक्के विद्यार्थी नापास झाल्याचे दिसून येते.जो विद्यार्थी कंटीन्यु टायपिंग करतो आणि परीक्षेकरीता पुर्ण तयारी करतो त्याला जर २० पैकी १ ते ५ मार्क मिळत असेल तर ही कसली परीक्षा म्हणावी! यामुळे हायकोर्टाच्या टायपिंग टेस्ट परीक्षेत मोठ्या प्रमाणात तृटी असल्याचे सिद्ध होते व प्रश्न चिन्ह उपस्थित होतो.यावरून आपण समजू शकतो की, महाराष्ट्रातील संपूर्ण सेंटरवर गोंधळाचे वातावरण होते.त्यामुळे आता यावर एकच उपाय आहे तो म्हणजे ताबडतोब फेरपरीक्षा घेणे. कारण जेव्हा ११५९२२ उमेदवार परीक्षा देतात त्यातून टायपिंग परीक्षेसाठी मेहनतीच्या बळावर राज्यात ११६१७ उमेदवार पात्र ठरतात आणि याही ठिकाणी सर्वच सेंटरवर मोठ्या प्रमाणात उमेदवार गोंधळतात यावरून स्पष्ट होते की, परीक्षा व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिक तृटी अवश्य असावी.त्यामुळे हा गोंधळ फक्त संभाजीनगर, मुंबई, भंडारा, कल्याण, अमरावती, वर्धा यांच्या पुरता सिमित नसून संपूर्ण १९ सेंटरवर हा गोंधळ झालेला आहे ही बाब सिद्ध होते.याला तर विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खुला खेळच म्हणावा लागेल.विद्यार्थ्यांच्या बाबतीत सर्वत्र सावळा गोंधळ होतांना आपण पहाले;आता हायकोर्टाच्याही परीक्षेतही गोंधळात- गोधळात गोंधळ मग आता विद्यार्थ्यांनी करायचे तरी काय असे अनेक प्रश्न आज युवा पिढीपुढे उपस्थित होत आहे.हायकोर्टाने २०२६ करीता लिपिक भरती पदासाठी जाहिरात प्रसिद्ध केली यात एकुण ११५९२२ अर्ज आलेत याची परीक्षा सुरळीत पार पडली व टायपिंग टेस्टसाठी ११६१७ उमेदवार पात्र ठरले.अशा परिस्थितीत ११६१७ विद्यार्थ्यांच्या आशा उंचावल्या आणि त्यांच्यात आनंदाचे वातावरण दिसून आले कारण ज्या क्षेत्रातील ही परीक्षा होती ते क्षेत्र कायद्याचे क्षेत्र असल्याने जे काही होईल ते योग्यच होईल असे विद्यार्थ्यांना ठाम वाटत होते. परंतु हायकोर्टाच्या टायपिंग टेस्ट परीक्षेत सर्वत्र महाघोळ आढळून आला व संपूर्ण परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्या व सर्वत्र गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2350 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्ग अतिक्रमणमुक्त करण्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांचे निर्देश

## मिशन मोडवर कार्यवाही; अतिक्रमणधारकांना पूर्वसूचना देण्याचे आदेश

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.




**परभणी :** जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय व राज्य महामार्गालगतची अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निश्चित कालमर्यादेत हटविण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस, उपप्रादेशिक परिवहन विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद तसेच संबंधित महामार्ग यंत्रणांनी परस्पर समन्वयाने मिशन मोडवर कार्यवाही करावी. जिल्ह्यातील महामार्ग ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत अतिक्रमणमुक्त करण्याचे नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले.

सर्वोच्च न्यायालयाने दि. १३ जुलै २०२६ रोजी स्वतःहून दखल घेतलेल्या याचिका व रिट याचिकेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, संबंधित राष्ट्रीय व राज्य महामार्ग विभागांचे कार्यकारी अभियंता, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी चव्हाण यांनी सांगितले की, महामार्गालगतच्या अतिक्रमणांवर कार्यवाही करताना केवळ रस्त्याची डांबरी रुंदी विचारात न घेता संबंधित महामार्गाची अधिकृत Right of Way (ROW), मंजूर संरेखन, भूसंपादन अभिलेख, सीमांकन व प्रत्यक्ष हद्द यांची खातरजमा करावी. प्रत्येक ठिकाणी अतिक्रमणाचे डिमार्केशन करून महामार्गाची अधिकृत हद्द निश्चित करावी. आवश्यक त्या ठिकाणी महसूल, महामार्ग विभाग व स्थानिक प्रशासन यांच्या संयुक्त पथकाद्वारे मोजणी व सीमांकनाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.

राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित विभागांनी स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करावी. अतिक्रमणधारकांना नियमानुसार पूर्वसूचना देऊन निर्धारित कालावधीत अतिक्रमण स्वतःहून काढून घेण्याचे आवाहन करावे. त्यानंतरही अतिक्रमण कायम राहिल्यास कायद्यानुसार निष्कासनाची कार्यवाही करण्यात यावी. कार्यवाहीसाठी आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून घेण्यात यावा. कोणत्याही कारणामुळे कार्यवाहीला विलंब होऊ नये, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

परभणी जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांच्या विविध मार्गांची हद्द व ROW रस्त्यानुसार वेगवेगळी असल्याने सरसकट निश्चित रुंदी गृहीत धरून अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करू नये. संबंधित महामार्गाचा Final Land Acquisition Notification/ Award, महसूल गाव नकाशा, मंजूर Alignment Plan, ROW Plan/Land Schedule, Chainage व Boundary Pillars तसेच संबंधित महामार्ग प्राधिकरणाची अद्ययावत संयुक्त मोजणी यांचा आधार घ्यावा, असेही जिल्हाधिकारी चव्हाण यांनी स्पष्ट केले.

# "माझा एक दिवस माझ्या बळीराजासोबत" उपक्रमांतर्गत सनपुरी येथे सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाचे शास्त्रज्ञ आणि रावे विद्यार्थ्यांचा ग्रामस्थांशी संवाद

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी




**परभणी** :-वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या संकल्पनेतून आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने "माझा एक दिवस माझ्या बळीराजासोबत" हा उपक्रम मौजे सनपुरी, ता. जि. परभणी येथे दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी राबविण्यात आला.

सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या सातव्या सत्रातील ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम (RAWE) अंतर्गत २३ विद्यार्थी दोन महिन्यांसाठी मौजे सनपुरी येथे दाखल झाले आहेत. ग्रामीण भागातील प्रत्यक्ष कार्यानुभवातून शिक्षण घेण्याबरोबरच विद्यापीठाने विकसित केलेले कृषी व सामुदायिक विज्ञानविषयक तंत्रज्ञान, महिला सक्षमीकरणाच्या संकल्पना तसेच विविध विस्तार उपक्रम ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य हे विद्यार्थी करणार आहेत. या विद्यार्थ्यांची 'ग्रामकन्या' आणि 'ग्रामदूत' म्हणून निवड करण्यात आली आहे.

या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. नीता गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली रावे कार्यक्रम समन्वयक तथा विभागप्रमुख डॉ. शंकर पुरी यांच्या समन्वयाने करण्यात येत आहे. गावात दाखल झाल्यानंतर ग्रामकन्या व ग्रामदूतांनी अधिष्ठाता डॉ. नीता गायकवाड आणि डॉ. शंकर पुरी यांच्या समवेत उपसरपंच श्रीमती गोदावरी सुगंधे तसेच ग्रामस्थांची बौद्ध विहार येथे भेट घेऊन संवाद साधला. यावेळी गावातील विविध सामाजिक, शैक्षणिक व कृषीविषयक गरजांची माहिती घेण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी देण्यात आलेल्या संपर्क कुटुंबांच्या भेटी घेऊन कुटुंबांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती, दैनंदिन कामकाज, शेतीतील सहभाग आणि महिलांच्या कामाचे स्वरूप याबाबत प्राथमिक माहिती जाणून घेण्यात आली.

# आमदार अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्याला यश; सोयगाव तालुक्यासाठी नवीन रोहित्रांचा पुरवठा सुरु

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.१८ ऑगस्ट

सोयगाव तालुक्यातील वीजपुरवठा अधिक सक्षम व सुरळीत करण्यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.त्यांच्या मागणीच्या अनुषंगाने महावितरणने सोयगाव तालुक्यासाठी नवीन वितरण रोहित्रे उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली असून,पहिल्या टप्प्यात दि.17 ऑगस्ट रोजी 100 के.व्ही.ए. क्षमतेचे 25 नवीन रोहित्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सोयगाव तालुक्यासाठी 100 के.व्ही.ए. क्षमतेची आणखी 300 नवीन रोहित्रे उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार अब्दुल सत्तार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. या मागणीसंदर्भात महावितरणच्या मुख्य अभियंता कार्यालयाने दि.17 ऑगस्ट 2026 रोजी पत्राद्वारे कार्यवाहीची माहिती दिली आहे.

आमदार अब्दुल सत्तार यांच्या सुचनेने महावितरणच्या 'निरंतर वीज योजना' अंतर्गत ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळावा,यासाठी जुनी रोहित्रे बदलणे, रोहित्रांची ऑईल बदलणे तसेच त्यांची क्षमता वाढविण्याची कामे सुरू आहेत.

याच योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडळासाठी आतापर्यंत 100 के.व्ही.ए.क्षमतेची 405 व 200 के.व्ही.ए. क्षमतेची 10 नवीन वितरण रोहित्रे, अशी एकूण 440 नवीन रोहित्रे उपलब्ध करून देण्यात आल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

या निर्णयामुळे सोयगाव तालुक्यातील वीजपुरवठ्याची क्षमता वाढण्यास मदत होणार असून,वारंवार वीज खंडित होण्याच्या समस्येला आळा बसण्यासह शेतकरी,व्यापारी व घरगुती ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे.वीजपुरवठा सक्षम करण्यासाठी मंत्री अब्दुल सत्तार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि त्यातून प्रत्यक्षात सुरू झालेली कार्यवाही ही सोयगाव तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार आहे.

# आदर्श राज्यकारभाराचा वस्तुपाठ अहिल्यादेवींनी घालून दिला- निलेश गद्रे यांचे प्रतिपादन

## पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या पुण्यतिथी निमित्त व्याख्यानमाला व पुरस्कार वितरण सोहळा

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.



**परभणी** :- आदर्श राज्यकारभार कसा असावा आणि राज्यकर्त्याने जनतेप्रती कोणती भूमिका ठेवावी, याचा आदर्श वस्तुपाठ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी देशासमोर ठेवला. त्यांचे संपूर्ण जीवनचरित्र अलौकिक घटनांनी भरलेले असून, समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी केलेले जीवनकार्य आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र कार्यकारणी सदस्य निलेश गद्रे यांनी केले.

शहरातील वसमत रस्त्यावरील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात गुरुवार 13 ऑगस्ट रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथीनिमित्त गंगा शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने कै. दत्तराव रौंदळे व कै. गंगाबाई दत्तराव रौंदळे स्मृती व्याख्यानमाला व पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी 'अहिल्यादेवींचे जीवन कार्य' या विषयावर गद्रे यांचे व्याख्यान झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे परभणी विभाग संघचालक डॉ. रामेश्वर नाईक होते. यावेळी मंचावर पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, विद्याभारतीच्या अखिल भारतीय मंत्री डॉ. मधुश्री सावजी, रामकिशन रौंदळे आदींची उपस्थिती होती. आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी पाठविलेला शुभेच्छा संदेश यावेळी वाचून दाखविण्यात आला.

याच सोहळ्यात विद्याभारतीच्या अखिल भारतीय मंत्री डॉ. मधुश्री सावजी यांना पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाल, श्रीफळ, मानपत्र आणि अहिल्यादेवींची मूर्ती असे पुरस्काराचे स्वरूप होते.

पुढे बोलतांना निलेश गद्रे यांनी अहिल्यादेवींच्या जीवनातील विविध प्रेरणादायी आणि रोमहर्षक प्रसंग अत्यंत सुलभ भाषेत मांडले. मराठा सरदार मल्हारराव होळकर आणि पेशवे थोरले बाजीराव यांनी मल्हाररावांच्या मुलासाठी निवडलेली अहिल्यादेवी पुढे किती धाडसी आणि पराक्रमी ठरल्या, याचे विविध प्रसंग त्यांनी सांगितले. अहिल्यादेवींना त्यांच्या साधुत्वपूर्ण राहणी आणि धर्मकार्यामुळे 'पुण्यश्लोक' ही पदवी प्राप्त झाली. काशी विश्वनाथासह भारतातील बाराही ज्योतिर्लिंगांच्या पुनरुत्थान व पुनर्बांधणीसाठी त्यांनी स्वतःच्या वैयक्तिक संपत्तीचा उपयोग केला. कुटुंबातील 23 नातलगांचे मृत्यू पाहूनही या थोर साध्वीने खचून न जाता जनसेवेसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. त्यामुळेच त्या खऱ्या अर्थाने पुण्यश्लोक ठरल्या, असे गद्रे यांनी सांगितले.

अहिल्यादेवींच्या काळातील राज्यव्यवस्थेचा संदर्भ देताना गद्रे म्हणाले की, होळकर घराण्यातील उत्पन्नाचा ठरावीक हिस्सा महिलांच्या नावे स्वतंत्रपणे राखून ठेवण्याची पद्धत होती. या निधीचा विनियोग अहिल्यादेवींनी गोरगरीब, वंचित तसेच धार्मिक कार्यासाठी केला. त्यांच्या सासूबाईंना माहेरकडून वारसा हक्काने मिळालेली संपत्तीही अहिल्यादेवींच्या नावे करण्यात आली होती. अत्यंत साधेपणाने जीवन जगत त्यांनी जनतेच्या कल्याणासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांचे विचार आणि कार्य आजच्या पिढीने आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# प्रसिद्धी नको फक्त जनतेची कामे हवीत सभापती उत्तम चव्हाणांचा हसतमुख कारभार जिंकतोय जनतेची मने

## माजी सभापतींच्या काळात रडणारे अधिकारी आता चव्हाणांच्या प्रेमामुळे करतायत हसतमुखाने काम कार्यकर्त्यांची छाती अभिमानाने फुलली



**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर सत्तेचा माज नाही तर जनतेच्या सेवेचा ध्यास हे ब्रीदवाक्य खऱ्या अर्थाने जगणारे पंचायत समितीचे धडाडीचे आणि सर्वसामान्यांचे लाडके सभापती उत्तम चव्हाण यांची आज त्यांच्या दालनात सदिच्छा भेट घेतली यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश लोखंडे नंदू शेळके परवेज शेख आणि पत्रकार शेख हक्कानी उपस्थित होते आणि संवादादरम्यान त्यांचा कामाचा झपाटा आणि जनतेबद्दलची तळमळ स्पष्ट दिसून आली

आधी काम मग प्रसिद्धी

सध्या अनेक नेते काम कमी आणि सोशल मीडियावर प्रसिद्धी जास्त करतात पण सभापती चव्हाण साहेब याला अपवाद ठरले आहेत त्यांनी अगदी स्पष्ट शब्दांत सांगितले की माझ्या या ५ वर्षांच्या कार्यकाळात मला फक्त आणि फक्त जनतेची प्रलंबित कामे पूर्ण करायची आहेत सोशल मीडियावरील प्रसिद्धी आणि फोटोबाजी नंतर सावकाश करता येईल सध्या माझा फोकस फक्त कामावर आहे त्यांचा हा प्रामाणिकपणा ऐकून तिथे उपस्थित प्रत्येकाचे मन जिंकले गेले

१५ ऑगस्टचा तो अभिमानास्पद प्रसंग

त्यांच्या याच साधेपणाची आणि लोकप्रियतेची प्रचिती १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन रोजी आली. परिसरातील स्थानिक नागरिकांनी आणि कार्यकर्त्यांनी त्यांना अत्यंत हट्टाने आणि प्रेमाने चहापानासाठी बोलावले होते साहेब जेव्हा तिथे पोहोचले तेव्हा उपस्थित असलेल्या प्रत्येक नागरिकाच्या चेहऱ्यावर आपल्या लाडक्या नेत्याला पाहून एक वेगळाच आनंद आणि अभिमान ओसंडून वाहत होता

तुमची पद्धतच भारी आहे साहेब

चहापानादरम्यान उपस्थितांनी अत्यंत मोकळेपणाने त्यांच्या कामाची पावती दिली उपस्थितांनी जुन्या आठवणींना उजाळा देत सांगितले की साहेब तुमच्या आधी जे सभापती होते त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या अरेरावीच्या भाषेमुळे प्रशासनाचे अधिकारी आणि बीडीओ BDO अक्षरश रडकुंडीला यायचे पण तुमची पद्धतच एकदम वेगळी आणि भारी आहे तुम्ही अगदी प्रेमाने आणि हसतमुखाने कामे सांगता तुमच्या या स्वभावामुळे प्रशासनातील अधिकारीही कोणतीही नाराजी न दाखवता आनंदाने जनतेची कामे मार्गी लावत आहेत

कार्यकर्त्यांचा आणि जनतेचा विजय

केवळ अधिकाराचा रुबाब न दाखवता सर्वांना सोबत घेऊन प्रेमाने कामे कशी काढून घ्यायची याचा एक उत्तम आदर्श सभापती उत्तम चव्हाण यांनी घालून दिला आहे त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे आज त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या आणि त्यांना निवडून देणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याची आणि गावकऱ्याची छाती आज अभिमानाने ५६ इंचाची झाली असेल आपला माणूस सत्तेत बसल्यावर सर्वसामान्यांचे प्रश्न कसे सुटतात आणि तालुक्याचा विकास कसा होतो याचे हे जिवंत उदाहरण आहे विरोधक काहीही म्हणोत पण सभापती साहेबांच्या प्रेमाने आणि कामाच्या धडाक्याने संपूर्ण तालुक्याची मने जिंकली आहे

# झेडपी टॅलेंट सर्च परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१८ ऑगस्ट

जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव व कुरुक्षेत्र करिअर अकॅडमी सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या झेडपी टॅलेंट सर्च परीक्षा नुकत्याच उत्साहात पार पडल्या.परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

स्पर्धेत सृष्टी अण्णा वाघ हिने प्रथम,देवयानी निलेश मिसाळ हिने द्वितीय,पलक भागवत गायकवाड हिने तृतीय,तर देवयानी गोपाल आवटे हिने चतुर्थ क्रमांक मिळविला. या चारही विद्यार्थ्यांना स्व.देवकाबाई कृष्णा तोताराम ढगे यांच्या स्मरणार्थ रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच इतर दहा गुणवंत विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली.यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन जिल्हा परिषद प्रशाला, सोयगावचे शिक्षकवृंद,शालेय व्यवस्थापन समिती तसेच माजी विद्यार्थी संघ यांच्या वतीने करण्यात आले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होण्यास मदत झाली असून,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची गोडी निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक दादाराव राठोड,एनएमएमएस परीक्षा प्रमुख भास्कर चौधरी तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक सचिन ढगे यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असल्याचे सांगितले.

# निंबायती ते निंबायती तांडा या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन खासदार डॉ.कल्याणराव काळे यांच्या हस्ते संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी




**सोयगाव,दि.१८ ऑगस्ट :** सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातील निंबायती व निंबायती तांडा येथे प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत निंबायती ते निंबायती तांडा या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन खासदार डॉ.कल्याणराव काळे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार अब्दुल सत्तार होते.

या रस्त्यासाठी २ कोटी ७७ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून,या निधीतून पुलासह रस्त्याचे काम करण्यात येणार आहे.त्यामुळे निंबायती व निंबायती तांडा परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार असून,परिसराच्या विकासाला गती मिळणार आहे.आमदार अब्दुल सत्तार म्हणाले,"निंबायती व निंबायती तांडा परिसरातील नागरिकांची रस्त्याची मागणी अनेक दिवसांपासून होती.या रस्त्यासाठी २ कोटी ७७ लाखांचा निधी मंजूर झाला असून,पुलासह दर्जेदार काम पूर्ण करण्याला प्राधान्य दिले जाईल.या रस्त्यामुळे नागरिकांची वाहतूक सुलभ होऊन परिसराच्या विकासाला निश्चितच चालना मिळेल."खासदार डॉ.कल्याणराव काळे म्हणाले, "प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर झालेल्या या रस्त्यामुळे निंबायती आणि निंबायती तांडा या गावांचा दळणवळणाचा प्रश्न सुटणार आहे.विकासकामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करून नागरिकांना त्याचा लाभ मिळवून देणे हीच आपली प्राथमिकता आहे."

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबा) काळे, सिल्लोड शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव तायडे,जिल्हा बँकेचे संचालक अर्जुन गाढे,सिल्लोड-सोयगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सतीश ताठे,शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल,सिल्लोडचे उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ,शेख सलीम हुसेन,राजेंद्र ठोंबरे,शमा तडवी, अली बाबा तडवी,मोहसीन तडवी,संतोष बोडखे,अक्षय काळे,कादिर शहा,राजू दुतोंडे,कुणाल राजपूत,यशवंत जाधव यांच्यासह स्थानिक पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एक रस्ता दोन नेते आणि श्रेय लाटण्यासाठी जंगलात फोटोबाजी' 40 वर्षे रखडलेल्या सावळदबारा रस्त्याला निवडणुकीच्या तोंडावर अचानक फुटलाय फुटवा

## मीच आणला रस्ता सांगण्यासाठी अब्दुल सत्तार आणि इद्रिस मुलतानी यांच्यात रंगलाय क्रेडिट वॉर तमाशा जनतेच्या पैशांवर नेत्यांची फुशारकी

हिंदू प्रकाशवार्ता/ शेख हक्कानी





**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर गेली ४० वर्षे ज्या सावळदबारा परिसरातील जनतेने रस्ता नसल्यामुळे खड्डे धूळ आणि चिखल तुडवला त्या जनतेच्या नशिबी आता निवडणुकीच्या तोंडावर नेत्यांचा राजकीय तमाशा पाहण्याची वेळ आली आहे गोद्री पळसखेडा टिटवी सावळदबारा या बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित रस्त्याच्या कामाला हिरवा कंदील मिळताच हा रस्ता मीच मंजूर केला अशी छाती बडवण्यासाठी विद्यमान आमदार अब्दुल सत्तार आणि भाजपचे नेते इद्रिस मुलतानी यांच्यात नारळ फोडण्याची जीवघेणी शर्यत लागली आहे

गेली अनेक दशके शांत असलेल्या या जंगलात सध्या प्राण्यांपेक्षा नेत्यांच्या गाड्यांच्या आणि त्यांच्या 'कॅमेऱ्यांच्या फ्लॅश'चाच सुळसुळाट जास्त पाहायला मिळत आहे

सत्तार साहेबांची 'हॅट्रिक' की हवेतच उद्घाटने

सत्तार गटाचा दावा आहे की हा रस्ता आम्ही २० फेब्रुवारी २०२३ रोजीच मंजूर करून आणला होता पण मग प्रश्न असा पडतो की जर रस्ता आधीच मंजूर होता तर आजवर तो वनविभागाच्या लालफितीत का सडत होता विरोधकांच्या म्हणण्यानुसार सत्तार साहेबांनी गेल्या काही वर्षांत या रस्त्याचे तब्बल तीन वेळा कागदोपत्री आणि हवेतल्या हवेत' उद्घाटन करून जनतेच्या डोळ्यात नुसती धूळफेक केली आहे आता जेव्हा खरंच काम सुरू होण्याची वेळ आली तेव्हा सत्तार साहेब अचानक जंगलात पायी फेऱ्या मारून मीच तारणहार असल्याचा आव आणत आहेत

मुलतानींचा जंगल सफारी' ते 'दिल्ली दरबार ड्रामा

दुसरीकडे इद्रिस मुलतानी यांनी तर या 'क्रेडिट वॉर मध्ये पूर्ण ताकद झोकून दिली आहे सत्तार हे फक्त खोटे नारळ फोडतात मी प्रत्यक्ष काट्याकुट्यातून पायी चालून पाहणी केली असा दावा करत मुलतानींनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दरबारात' हजेरी लावली मी ३ महिन्यात वनविभागाची मंजुरी आणली अशी गर्जना करत मुलतानी गट आता गावभर पेढे वाटत सुटला आहे

जंगलात फक्त फेऱ्या आणि फोटोबाजी

सध्या या दोघांचेही कार्यकर्ते सोशल मीडियावर आमचाच नेता कसा भारी हे दाखवण्यासाठी भिडले आहेत प्रत्यक्षात वन संवर्धन कायद्यानुसार हा रस्ता वनविभागाच्या अखत्यारीत येतो जोपर्यंत वन विभाग झोपेतून उठून कायदेशीर मंजुरी देत नाही तोपर्यंत कुठल्याही नेत्याची ताकद नाही की तिथे तो एक दगडही हलवू शकेल

पण निवडणुका तोंडावर आल्याने कुणालाही या तांत्रिक प्रक्रियेशी देणंघेणं नाही जनतेचा टॅक्सचा पैसा आणि प्रशासनाची मंजुरी पण पाटी लावायला मात्र हे दोघेही नेते हातात खोरे पावडे घेऊन जंगलात फोटोबाजी करत सुटले आहेत

जनता विचारतेय खरा बाप कोण

४० वर्षे या रस्त्यासाठी वनविभागाचे उंबरठे झिजवणारे सामान्य नागरिक आणि शासन दरबारी खेटे मारणारे खरे लोक उघड्यावरच आहेत आता रस्ता प्रत्यक्षात उतरत असताना या रस्त्याचा बाप मीच हे सिद्ध करण्यासाठी सुरू असलेली ही 'राजकीय कुस्ती' पाहून सामान्य जनता मात्र गालातल्या गालात हसत आहे

जनतेला चांगलंच माहिती आहे की रस्ता ना सत्तार साहेबांच्या खिशातून आलाय ना मुलतानींच्या हा रस्ता जनतेच्या घामाच्या पैशातून बनत आहे त्यामुळे या नेत्यांनी श्रेयाची मलाई खाण्यापेक्षा काम दर्जेदार कसं होईल याकडे लक्ष दिलं तर जास्त बरं होईल

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर 40 वर्षांची प्रतीक्षा संपण्याच्या मार्गावर; गोद्री-पळसखेडा-टिटवी-सावळदबारा रस्त्याच्या साफसफाईच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात

**हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी**

सोयगाव,दि.१८ ऑगस्ट

गेल्या सुमारे ४० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या गोद्री-पळसखेडा-टिटवी-सावळदबारा या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाली आहे.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर संबंधित विभागाने आवश्यक कार्यवाही सुरू केली असून,

वन विभागाच्या माध्यमातून रस्त्याच्या साफसफाईच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली.परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीत या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

सुमारे तीन महिन्यांपूर्वी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी,सोयगाव पंचायत समितीचे सभापती उत्तम चव्हाण आणि पंचायत समिती सदस्य राहुल राठोड यांनी या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी संपूर्ण मार्गावर पायी प्रवास करत पाहणी व सर्वेक्षण केले होते.रस्त्याची वस्तुस्थिती जाणून घेतल्यानंतर या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यात आली.यावेळी रस्त्याबाबत सविस्तर निवेदन सादर करून गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाला तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

गोद्री ते पळसखेडा हा मार्ग वनक्षेत्रातून जात असल्यामुळे वन विभागाच्या आवश्यक मंजुरीअभावी या रस्त्याचे काम अनेक वर्षांपासून रखडले होते.स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींकडून सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करण्यात येत होता.अनेकदा भूमिपूजन व उद्घाटन झाले; मात्र विविध प्रशासकीय अडचणींमुळे प्रत्यक्ष कामाला सुरुवात होऊ शकली नव्हती.

मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत आवश्यक प्रक्रिया वेगाने पूर्ण केली.वन विभागाची मंजुरी मिळाल्यानंतर आता रस्त्याच्या साफसफाईच्या कामाला सुरुवात झाली असून,या बहुप्रतीक्षित रस्त्याच्या प्रत्यक्ष निर्मितीचा मार्ग मोकळा झाला आहे.



बारा गावांसाठी ठरणार जीवनवाहिनी

गोद्री-पळसखेडा-टिटवी-सावळदबारा हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर सावळदबारा परिसरातील सुमारे बारा गावांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः जामठी व परिसरातील नागरिक,विद्यार्थी,शेतकरी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

रस्ता पूर्ण झाल्यानंतर प्रवासाचे अंतर आणि वेळ मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार असून,शिक्षण, आरोग्य,शेतीमालाची वाहतूक,व्यापार-व्यवसाय आणि दैनंदिन दळणवळण अधिक सुलभ होणार आहे.त्यामुळे या संपूर्ण परिसराच्या विकासाला नवी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

निवडणुकीत दिलेले आश्वासन पूर्ण करण्याच्या दिशेने ठोस पाऊल

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांदरम्यान परिसरातील नागरिकांना या रस्त्याच्या कामाचे आश्वासन देण्यात आले होते.नागरिकांनी दाखविलेला विश्वास आणि दिलेले आश्वासन पूर्ण करण्याच्या उद्देशाने या रस्त्यासाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करण्यात आला.

या पाठपुराव्याला मंत्री गिरीश महाजन,मंत्री अतुलजी सावे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे आणि रामेश्वर नाईक यांच्यासह विविध नेतेमंडळींचे वेळोवेळी सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सकारात्मक निर्देशामुळे आज या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या महत्त्वपूर्ण कामासाठी सहकार्य करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,मंत्री गिरीश महाजन,मंत्री अतुल सावे,माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे,रामेश्वर नाईक तसेच संबंधित सर्व विभागांचे अधिकारी व प्रशासन यांचे भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी,जिल्हा परिषद सदस्य माहीम मुलतानी,सोयगाव पंचायत समितीचे सभापती उत्तम चव्हाण आणि पंचायत समिती सदस्य राहुल राठोड यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

४० वर्षांपासून प्रलंबित असलेला हा रस्ता आता प्रत्यक्ष कामाच्या दिशेने पुढे सरकल्याने सावळदबारा परिसरातील नागरिकांच्या आशा पल्लवित झाल्या असून, हा रस्ता परिसराच्या विकासाची नवी जीवनवाहिनी ठरणार आहे.

# खामखेड्याच्या शैक्षणिक वाटचालीला आधुनिकतेची नवी दिशा

## गावकऱ्यांच्या एकजुटीतून जिल्हा परिषद शाळेत दोन इंटरॅक्टिव्ह पॅनल क्लासरुम

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून खामखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दोन इंटरॅक्टिव्ह पॅनल क्लासरूमचे उद्घाटन उत्साहात करण्यात आले. गावकऱ्यांचे सहकार्य, शाळेबद्दलची आपुलकी आणि शिक्षकांच्या प्रयत्नांतून साकारलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक सुलभ, प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळणार आहे.

शाळेच्या विकासासाठी गावकऱ्यांनी एकजूट दाखवत पुढाकार घेतला. 'गाव एकत्र आले की शाळा समृद्ध होते आणि शाळा समृद्ध झाली की गावाचे भविष्य उज्ज्वल होते,' याचा प्रत्यय खामखेड्यात आला. बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी इंटरॅक्टिव्ह पॅनल क्लासरूम महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

खामखेडा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक शिंदे, सहशिक्षक ढोबळे आणि शिक्षक शिंदे या त्रिमूर्तीचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष योगदान आहे. केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या मेहनतीमुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीतही सकारात्मक बदल दिसून येत आहेत.

यावेळी शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष योगेश फदाट, माजी उपसरपंच रामदास जाधव, मुख्याध्यापक शिंदे, सहशिक्षक ढोबळे, शिक्षक शिंदे आणि पोलिस पाटील शाहरुख खान यांची उपस्थिती होती. गावकऱ्यांचा पाठिंबा आणि शिक्षकांची मेहनत यामुळे खामखेडा शाळेच्या शैक्षणिक वाटचालीत आधुनिकतेचा नवा अध्याय सुरू झाला आहे.

# प्राचार्य डॉ.मजहर फारुकी यांचा मानपत्र देऊन गौरव

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अभ्यास मंडळ व मौलाना आझाद महाविद्यालयात यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे कार्यशाळा घेण्यात आली. नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे अभ्यासक्रमाची रचनेविषयी मार्गदर्शन तसेच प्राचार्य डॉ.मजहर फारुकी यांच्या सेवा निवृत्तीनिमित्त गौरव करण्यात आला. कार्यक्रमात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. भास्कर साठे, प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनीता बोर्डे, 'आयक्यूएसी'चे संचालक डॉ. गुलाब खेडकर यांनी मार्गदर्शन केले.

# घाटीत देहदानाचा ओघ सुरूच; महिनाभरात पाचवे देहदान

## वर्षभरात 32 जणांनी केले देहदान; 2026 मध्ये 56 जणांचे देहदानासाठी इच्छापत्र

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** मृत्यूनंतरही आपले शरीर समाजाच्या आणि वैद्यकीय शिक्षणाच्या उपयोगी पडावे, या उदात्त भावनेतून घाटी रुग्णालयात देहदानाचा ओघ सुरूच आहे. ऑगस्ट महिन्यातील पाचवे, तर सन २०२६ मधील ३२ वे देहदान घाटीतील शरीररचनाशास्त्र विभागाला प्राप्त झाले. विशेष म्हणजे, यंदा आतापर्यंत ५६ नागरिकांनी देहदानासाठी इच्छापत्र दिले आहे.



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर तुंगेनवार यांच्या पुढाकारातून देहदानाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

कै. शोभा काळुराम वाघमारे (७०, रा. अंबरनाथ, ह.मु. वाळूज) यांचा देह घाटी रुग्णालयात देहदान म्हणून प्राप्त झाला. हे देहदान डॉ. विजय गायकवाड यांच्या परिचयातून झाले. यासाठी भाऊसाहेब खंडागळे, माधव गायकवाड आणि यश खंडागळे यांनी विशेष सहकार्य केले. देहदानाची संपूर्ण प्रक्रिया शरीररचनाशास्त्र विभागाच्या सहायक प्राध्यापक डॉ. पल्लवी चव्हाण यांनी पूर्ण केली.

देहदानाबाबत जनजागृती वाढविण्यासाठी विभागाच्या वतीने 'देहदान जनजागृती' विषयावर विशेष व्हिडिओ तयार करण्यात आला आहे. १५ ऑगस्ट रोजी या व्हिडिओचे प्रकाशन करण्यात आले असून, घाटीच्या बाह्यरुग्ण विभागातील पडद्यावर तो नियमितपणे प्रदर्शित केला जाणार आहे. त्यामुळे रुग्ण, नातेवाईक आणि नागरिकांमध्ये देहदानाबाबत व्यापक जनजागृती होण्यास मदत होणार आहे. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी दुःखद परिस्थितीतही कुटुंबीयांनी समाजाप्रती आस्था ठेवून घेतलेल्या निर्णयाचे कौतुक केले. तसेच नागरिकांनी देहदानासाठी पुढे यावे, असे आवाहन केले.

# महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यां सोबत साधला राजू मुंबईकर यांनी मुक्त संवाद !

**दै हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी**

**उरण /रायगड :** हिंदू संस्कृतीतील साजरा केला जाणारा पारंपरिक म्हणजे नागपंचमी हा सण श्रावण महिन्यात येणारा पहीला सण आहे ह्याच दिवशी भगवान श्रीकृष्णाने कालियामर्दन केले असे मानले जाते.याच नागपंचमी सणाचे औचित्य साधून महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेल येथे वन्यजीवप्रेमी आणि केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक महाराष्ट्र भूषण राजू मुंबईकर यांच्या माध्यमातून आयोजित प्रबोधनात्मक व्याख्यानमालेत खास करून युवा तरुणांमध्ये निसर्गाप्रती आत्मियता निर्माण व्हावी याच उदात्त भावनेतून महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना निसर्गातील जीवजंतू, प्राणी - पक्षांविषयी खास करून सापांबद्दल उपयुक्त माहिती देण्यासाठी व्याखनरुपी मार्गदर्शनपर प्रबोधनात्मक विचारमंथनपर चर्चासत्रात अर्थात " साप समज आणि गैरसमज "या व्याख्यान रुपी प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करून खास करून सापांबद्दलची उपयुक्त असी माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या मोठ्या प्रशस्त अश्या विवेकवाहिनी ऑडिटोरियम हॉलमध्ये फ्लेक्स ( फोटोच्यां ) माध्यमातून विषारी, निमविषारी आणि बिनविषारी सापांच्या अनेक जाती पाहायला मिळाल्या... सोबतच सापांबद्दलची उपयुक्त माहितीची देवाण - घेवाण करत विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची अचूक आणि उपयुक्त अशी माहिती देत विद्यार्थ्यांच्या मनात सापांबद्दलची असणारी भीती आणि अनेक गैरसमज देखील दूर करण्यात आले.





महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य या महाविद्यालयात राजू मुंबईकर यांनी घेतलेल्या प्रबोधनात्मक चर्चासत्रात सहभागी झालेले विद्यार्थी हे शहरी आणि ग्रामीण भागातून असल्यामुळे त्यांच्यात सापांबद्दलचे असणारे अनेक समज गैरसमज आणि भीती त्यांच्या बोलण्यातून आणि त्यांनी विचारलेल्या प्रश्नातून जाणवत होती. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देऊन आणि निसर्गातील जीव - जंतू आणि प्राणी - पक्षांबद्दलची आणि खास करून सापांबद्दलची उपयुक्त अशी माहिती देऊन राजू मुंबईकर यांनी विद्यार्थ्या मध्ये सापांबद्दलचे असणारे "समज आणि गैरसमज " आणि अंधश्रद्धाचं निरासरण केल.

नागपंचमी सणाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत सहभागी झालेल्या महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य रायगड भूषण गणेशजी ठाकूर,सहप्राचार्य प्रफुल्लजी वशेणीकर यांनी राजू मुंबईकर यांच्या माध्यमातून साकारलेल्या व्याख्यानरुपी प्रबोधनात्मक कार्यक्रमा द्वारे विद्यार्थ्यांना दिलेल्या सापांबद्दलच्या उपयुक्त अश्या माहितीमुळे राजू मुंबईकर यांचे भरभरून कौतुक करत आभार मानले.

या प्रबोधनात्मक अश्या व्याख्यान रुपी कार्यक्रमात सहभागी झालेले महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी वर्गाच्या उपस्थितीत हा प्रबोधनात्मक व्याख्यान पुष्प कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# चारठाण ते औंढा नागनाथ साठ किलोमीटर कावड यात्रा उत्साहात

**जिंतूर :** श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त चारठाण ते औंढा नागनाथ अशी सुमारे ६० किलोमीटरची पायी कावड यात्रा भक्तिमय वातावरणात काढण्यात आली. भगवान महादेवाच्या जयघोषात आणि हर हर महादेवच्या गजरात भाविकांनी उत्साहाने या यात्रेत सहभाग घेतला.



चारठाण येथून सुरू झालेल्या या कावड यात्रेत भाविकांनी खांद्यावर कावड घेऊन औंढा नागनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी पायी प्रवास केला. मार्गावर ठिकठिकाणी कावडधारी भाविकांचे स्वागत करण्यात आले. यात्रेमुळे संपूर्ण मार्गावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

जिंतूर शहरात कावड यात्रा दाखल झाल्यानंतर राहुल देशमुख यांच्या पेट्रोल पंपावर यात्रेचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. महाआरतीच्या वेळी उपस्थित भाविकांनी भगवान महादेवाचे दर्शन घेतले आणि हर हर महादेवचा जयघोष केला.

या प्रसंगी गोविंद थिटे, नाना राऊत यांच्यासह भाविक, नागरिक व कावड यात्रेतील सहभागी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रेकरूंना शुभेच्छा देत उपस्थितांनी त्यांच्या पुढील पायी प्रवासासाठी मंगलकामना केल्या.

श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाने पार पडलेल्या या कावड यात्रेमुळे जिंतूर परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. चारठाण ते औंढा नागनाथ हा ६० किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण करून भाविकांनी औंढा नागनाथ मंदिरात भगवान शंकराचे दर्शन घेण्याचा संकल्प केला.

# शिल्लेगाव पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड; पाच जणांवर गुन्हा, लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त

**छत्रपती संभाजीनगर :** शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वसुसायगाव शिवार येथे बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा मारून पाच जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत पोलिसांनी रोख रकमेसह चार दुचाकी आणि जुगाराचे साहित्य असा एकूण एक लाख ६९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, वसुसायगाव शिवारात काही जण विनापरवाना पत्त्यांवर पैसे लावून 'अंदर-बाहर' नावाचा जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सायंकाळच्या सुमारास घटनास्थळी अचानक धाड टाकली. या कारवाईदरम्यान सुभाष कु-हाडे (रा. रांजणगाव पोळ), देवसिंग महेर, विठ्ठल बिघोत (दोघे रा. एकभुर्जी वाघलगाव), सिराज शेख आणि शांताराम शेजवळ (दोघे रा. वसुसायगाव) हे पाच जण जुगार खेळताना रंगेहात पकडले गेले.

पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम, चार दुचाकी वाहने आणि पत्त्यांचा संच असा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी शिल्लेगाव पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# प्लास्टिक बंदीविरोधात जिंतूर नगरपंचायतीचा पुन्हा धडाका

## एकाच दिवसात सुमारे 15 हजारांचा दंड वसूल; दुकानदारांसह भाजी विक्रेत्यांवर कारवाई

**जिंतूर :** शहरात सिंगल यूज प्लास्टिकचा वापर व विक्री करणाऱ्यांविरोधात जिंतूर नगरपंचायतीच्या पथकाने पुन्हा एकदा कारवाईचा धडाका सुरू केला आहे. सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी नगरपंचायतीच्या पथकाने शहरातील विविध भागांत तपासणी करून प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करणाऱ्या विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई केली. या कारवाईत जवळपास १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.



नगरपंचायतीच्या पथकाने शहरातील किराणा दुकाने, भाजीपाला विक्रेते तसेच इतर व्यावसायिक आस्थापनांची तपासणी केली. शासनाने प्रतिबंधित केलेल्या सिंगल यूज प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर व विक्री होत असल्याचे आढळून आलेल्या ठिकाणी संबंधितांकडून दंड वसूल करण्यात आला. यापुढेही अशीच नियमित तपासणी सुरू ठेवण्यात येणार असल्याचे नगरपंचायतीकडून सांगण्यात आले.

यापूर्वीही नगरपंचायतीच्या पथकाने शहरातील विविध भागांत कारवाई करून दुकानदारांना प्लास्टिकचा वापर टाळण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, काही ठिकाणी पुन्हा प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पथकाने कारवाई अधिक तीव्र केली आहे.

शहरातील नागरिकांनी खरेदीसाठी कापडी किंवा पर्यावरणपूरक पिशव्यांचा वापर करावा, तसेच व्यापारी व विक्रेत्यांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करू नये, असे आवाहन नगरपंचायतीने केले आहे. प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी पुढील काळातही अचानक तपासणी व दंडात्मक कारवाई सुरू राहणार आहे.

### कारवाई सुरूच राहणार : गायत्री ठाकूर

**नगरपंचायतीच्या पथकाकडून प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियमित तपासणी केली जात आहे. नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळून नगरपंचायतीला सहकार्य करावे. प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर किंवा विक्री आढळल्यास नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल. शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे.**

**— गायत्री ठाकूर, सिटी कोऑर्डिनेटर, जिंतूर नगरपंचायत**

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911